# **प्रेस नोट**

## **परीमंडळ २ पुणे शहर विभागातील कोरेगांवपार्क पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रा मधून एक वर्षे (०१) हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- १५/०४/२०१९

कोरेगांवपार्क पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार **इसम नामेः- अमोल संपत वाखारे.वय-२७ वर्षे रा.लेन नं.५, कवडेवाडी, कोरेगांवपार्क,पुणे** यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ २, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १६/२०१९ दिनांक १५/०४/२०१९ रोजी एक वर्षे (०१) करीता पोलीस आयुक्त,पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रामधून तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम याचे विरुध्द गंभीर दुखापत करणे, जखमी करणे, हाताने मारहाण करुन शिवीगाळ करणे, सामाईक इरादा, दुखापत पोहोचविण्याच्या इराद्याने अंगावर धावून जाणे, नुकसान करणे, दंगा करणे, समान उदिष्ट साध्य करण्यासाठी बेकायदेशिर जमावात सामील होणे, वगैरे गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द कोरेगांवपार्क, बंडगार्डन, पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची कोरेगांवपार्क पोलीस ठाणे हद्दीमध्ये दहशत असल्याने त्यास बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पुणे शहर यांनी पोलीस आयुक्त,पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रा मधून एक वर्षे (०१) करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**(बच्चन सिंह)**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २,
पुणे शहर

<u>प्रेस नोट</u>

**परीमंडळ २ पुणे शहर विभागातील लष्कर पोलीस ठाण्याचे हद्दीतील सराईत गुन्हेगारास पुणे शहरातून व जिल्ह्यातून दोन वर्षासाठी हद्दपार केलेबाबत**

दिनांक :- १५/०४/२०१९

लष्कर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सराईत गुन्हेगार इसम नामे:- **महेश महादेव ओव्हाळ.वय-२५ वर्षे रा.मु.पो.पिसोळी, भापकरांचे खोली शेजारी, ग्रामपंचायचे मागे, ता.हवेली जि.पुणे.** यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५६ (१) (अ) (ब) प्रमाणे पोलीस उप आयुक्त परीमंडळ-२, पुणे शहर यांचेकडील तडीपार आदेश क्रमांक १७/२०१९ दिनांक १५/०४/२०१९ रोजी दोन वर्षा (०२) करीता पुणे शहर, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्रा बाहेर तडीपार करण्यात आले आहे. सदर इसम हा खून, दुखापत,घरफोडी इ. गंभीर गुन्हे करत आहे. त्याचे विरुध्द लष्कर, पोलीस ठाणे येथे वरील प्रमाणे गुन्हे दाखल असून त्याची सदर भागात दहशत असल्याने त्यास बच्चन सिंह, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर यांनी पुणे शहर,पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे व पुणे जिल्हयाचे कार्यक्षेत्राबाहेर दोन वर्षा (०२) करीता तडीपार केले आहे.

नागरीकांना तडीपार इसम दिसून आल्यास नजीकच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

**(बच्चन सिंह)**
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २
पुणे शहर